नि.फौ.खटला क्र. १३३/२०२३

निशाणी ०१ सोबत

फिर्यादीचे नांव – भानुदास आकाराम पाटील
वय – ८५ वर्षे, धंदा – निवृत्त
रा. खरशिंग, ता. कवठे महांकाळ, जि. सांगली.

शपथेवर कथन करतो की,

**फौजदारी प्रक्रिया संहिता २०० प्रमाणे फिर्यादीची पडताळणी.**

मी आजी माजी सैनिक ग्रामीण बिगर शेती पतसंस्थेत सन २००१ ते २००६ पर्यत संचालक म्हणून कार्यरत होतो. मी सुक्ष्म कर्जाकरीता २० सभासद गोळा केले होते. त्यावेळी २२०० रु. प्रत्येक सभासदाकरीता कर्ज मंजूर झाले होते. सदरील कर्ज संस्थेने मंजूर केले होते. सदरील कर्जापोटी प्रत्येक महिन्यास १०० रु या प्रमाणे २२ हप्त्यामध्ये कर्जाची परतफेड करावयाची होती. कर्जाची मंजूर झालेली रक्कम संस्थेने सभासदांना धनादेशाद्वारे अदा केली हाती. सदरील धनादेश संस्थेचे अध्यक्ष व सचिवांनी निर्गमित केले होते. सदरील धनादेश सभासदांना कॅशिअर सुरेश अंकुश लोंढे यांनी वाटप केले होते. त्यानंतर संस्थेने माझ्या विरुध्द मी सुक्ष्म कर्जात आर्थिक लाभ करुन घेतल्याच्या कारणावरुन फौजदारी केस दाखल केली होती. प्रस्तुतकामी २०२३ साली निकाल होवून मला निर्दोष सोडण्यात आले. त्यानंतर प्रस्तुतकामी खोटी केस करुन माझी मानहानी करण्यात आली होती. त्यामुळे मी हलीची फिर्याद दाखल केली आहे. मी वर नमुद केसच्या कामी प्रत्येक तारखेस न्यायालयात जात होतो. त्यामुळे आरोपीविरुध्द कारवाई व्हावी व मला नुकसान

JMFC
06-07-2024

भरपाई मिळावी. प्रस्तुतकामी सुरेश लोंढे, संतोष बाबासाहेब कोरे, हरीराम संदीपान लोंढे, पंढरीनाथ बापू कोरे, धोंडिराम जगन्नाथ शिंदे, हणमंत गजानन पाटील यांचेकडून माझे विरुध्द खोटी केस करण्यात आली होती.

श्रवणोत्तर निवदेन स्वीकृत.

फिर्यादीची सही.
(भानुदास आकाराम पाटील )

समोर,
06.07.2024
(पी. जे. लिगाडे)
सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
कवठेमहांकाळ

कवठे महांकाळ
दिनांक -०६/०७/२०२४